| | |
|---|---|
| **MHJN040028822023** | फौ. कि. अर्ज क्र. ४२२/२०२३<br>वर्षा वि. अजिंक्य |

## <u>निशाणी क्र.१५ वरील आदेश</u>

## (पारीत दिनांक ०५ मे २०२५)

सदरचा अर्ज हा अंतरिम अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**१.** अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दि.१५.०४.२०२२ रोजी मौजे साष्टपिंपळगाव, ता.अंबड, जि. जालना येथे हिंदु धर्मशास्त्रानुसार व झालेला आहे. लग्नामध्ये अर्जदार हिच्या आई–वडीलांनी रक्कम रू. मौल्यवान व किमती संसार उपयोगी वस्तु भेट देवून मोठया थाटामाटात लग्न करून दिले. विवाहानंतर अर्जदार लग्नानंतर साधारण १५ दिवस सासरच्या लोकांनी तिला व्यवस्थित वागणुक दिली. त्यानंतर लहान सहान किरकोळ कारणावरून गैरअर्जदार व त्याच्या आई–वडीलांनी अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करण्यास सुरूवात केली व तिच्या अंगावरील सर्व दागीने काढून घेवून मोबाईल हिसकावून घेतला व माहेरच्या लोकांशी बोलण्यास मनाई केली. त्यानंतर अर्जदार हिस गैरअर्जदार व त्याच्या आई–वडीलांनी घर बांधण्यासाठी माहेराहून रूक्कम रूपये ५,००,०००/– घेवून ये व स्वयंपाक येत नाही या कारणावरून असे म्हणून तिचा छळ करत राहीले. ती पुढे असे कथन करते की, ती सतत आजारी राहत असल्याने ती स्वत: कामधंदा करून स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. तसेच, तिला तिच्या दैनंदिन गरजा तसेच, वैदयकीय गरजांची पुर्तता करण्यासाठी दरमहा रक्कम रू. ५,०००/– खर्च येतो. याउलट, गैरअर्जदार याची मौजे गंगारामवाडी, ता. अंबड, जि. जालना येथे बागायती शेती असून व नौकरीच्या माध्यमातून त्यास वार्षिक रक्कम रू. १५,००,०००/–

इतके उत्पन्न होते, त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदारापासून दरमहा ५,०००/– पोटगी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून मिळण्याची प्रार्थना करते.

२. गैरअर्जदाराने निशाणी क्र.९ वर त्यांचा लेखी जवाब व म्हणणे सादर करून सदर अर्जाला विरोध दर्शवला. त्याने असे कथन केले की, त्याचा अर्जदारासोबत अत्यंत साधा विवाह झाला होता व अर्जदाराकडून कुठल्याही प्रकारचे साहित्य देण्यात आले नव्हते. अर्जदार ही गैरअर्जदारासोबत नांदावयास आल्यावर एकांतात अचानक अर्जदाराच्या वागण्यात बदल झाला व ती गैरअर्जदारास शिव्या मारहाण करू लागली त्यामुळे असे विचित्र वागणे पाहून गैरअर्जदाराल धक्का बसला. त्यानंतर त्याला हे लक्षात आले की, अर्जदार ही पायाने अपंग असून फसवणूक करून त्याचे लग्न लावून देण्यात आले आहे. याबाबत गैरअर्जदाराने अर्जदाराच्या घरचांना विचारणा केली असता, त्यांनी असे उत्तर दिले की, आता लग्न झाले आहे आता आम्ही काहीही करू शकत नाही. अन्यथा आम्ही तुमच्यावर केस दाखल करून तुम्हला अडकवू. त्यानंतर गैरअर्जदाराच्या आईने अर्जदारास जेवन बनवण्यास सांगितले असता, तिने येत नसल्याचे सांगितले. यावर गैरअर्जदाराच्या आईने शिवकण्याचा आग्रह धरला असता, अचानक अर्जदाराच्या वागण्यात आक्रमकता येवून अर्जदाराने स्वयंपाक ओटयावरील चाकू घेवून गैरअर्जदाराच्या आईवर हल्ला केला. त्यातून गैरअर्जदाराच्या आईने कशी–बशी सुटका करून घेतली. आज ना उद्या अर्जदार ही चांगली वागेल या आशेपोटी गैरअर्जदार हा संसार करत राहिला परंतु, एकेदिवशी अर्जदाराने मला संसार करायचा नाही व फारकत हवी आहे अन्यथा मी जिवाचे काहीही करेल असे ठणकावून सांगितले. त्यानंतर दि.३०.०४.२०२२ रोजी अर्जदाराने गैरअर्जदाराच्या आईकडे मला नविन नथ घेवून द्या असे म्हटले. त्यावर आपण उद्या घेवू असे गैअर्जदाराच्या आईने म्हणताच अर्जदार हिने मला आत्ताच्या आत्ता नथ हवी असे म्हणून गैरअर्जदार

यांच्या आईला मारहाण केली व घरामधील वस्तुंची तसेच, कपाट, टी.व्ही. यांची पितळाच्या ताब्या मारून तोड–फोड केली तसेच गैरअर्जदार यांच्या आईस बांधून ठेवले. पुढे तो असे कथन करतो की, गैरअर्जदाराने अर्जदार ही कदाचित वेगळे राहून व्यवस्थीत नांदेल या आशेपोटी तिला वेगळे घेवून संगमनेर येथे संसार करण्याचा प्रयत्न केला परंतु, तिच्या वागण्यामध्ये कुठलाही बदल झाला नाही व 'माझे वडील माझ्या नावावर तीन एकर शेती करून देणार आहे व माझ्या मतीमंद भावाचा मला सांभाळ करायचा आहे' त्यामुळे मला माहेरी नेवून घाला असे म्हणत सतत वाद घालत असे. तसेच, गैरअर्जदाराला 'तु माझी हौस पूर्ण करू शकत नाही मला सांभाळायची तुझी लायकी नाही' असे म्हणत भांडत असे. त्यानंतर गैरअर्जदाराने विचारणा केल्यावर ती लग्न झाल्यापासून लपून गोळया घेत असल्याची माहिती दिली. त्यानंतर दि.२०.१०.२०२२ रोजी स्वखुशीने अर्जदार ही दागिने व कपडे लत्ते घेवून माहेरी निघून गेली. तो पुढे असे कथन करतो की, अर्जदाराच्या माहेरी जाण्यामध्ये त्याचा कुठलाही दोष नसून सदर विवाह हा त्याला फसवणूक करून झालेला आहे. शिवाय अर्जदार ही तिचा खाजगी कामधंदा करून पालन पोषण करण्यास समर्थ आहे. याउलट गैरअर्जदार हा फसवणूकीने विवाह झाल्यामुळे नैराश्यातून झात असून त्याचे काम सुटले आहे. त्यामुळे तो सदरहू अर्ज फेटळण्याची प्रार्थना करतो.

**३.** दोन्ही कथनांचा विचार करता माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ. क्र | **<u>मुद्दे</u>** | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही सिध्द करते काय की, गैरअर्जदार हा पूरेसे साधन असतांना देखील स्वत:चे पालन पोषण करण्यास समर्थ नसणा–या अर्जदाराचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे ? | <u>होय</u> |

| | | |
|---|---|---|
| २ | अर्जदार ही सिध्द करते काय, की अर्जात मागीतललेली मागणी मिळण्यास ती पात्र आहे ? | अंशत: होय |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता:</u>**

**४.** अर्जाचे व त्यावरील उत्तराचे अवलोकन केले, अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार ही पत्नी असल्याची बाब गैरअर्जदाराला मान्य आहे. नि.क्र.४ वरील अर्जदाराचे तसेच, नि.क्र.१६ वरील गैरअर्जदाराच्या मालमत्ता व दायित्व यांच्या शपथपत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार ही तिचे पालनपोषण करण्यास समर्थ नाही व तिला तिच्या दैनंदिन गरजासाठी खर्च करावा लागतो. परंतु, तिच्याकडे उत्पन्नाचे कूठलेही साधन दिसून येत नाही. याउलट, गैरअर्जदार हा महिण्याकाठी ब–यापैकी उत्पन्न मिळवत असून देखील तो हेतूपरस्पर अर्जदाराचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे त्यामुळे मी **मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो**. सदर अर्जाच्या माध्यमातून अर्जदार हीने तिच्याकरीता दरमहा ५,०००/– रूपये अशी अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु, उपलब्ध कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे मागितलेली संपूर्ण रक्कम या घडीला मंजूर करणे योग्य ठरणार नाही. परंतु, दोन्ही पक्षकारांच्या जीवनस्थराचा विचार करता काही रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मंजूर करणे योग्य होईल. त्यामुळे मी **मूद्दा क्र.२** चे उत्तर तसे नोंदवून **मुद्दा क्र.३** च्या उत्तरादाखल पूढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजूर.
२. गैरअर्जदार याने अर्जदार हिला दरमहा रू. ३,०००/– दरमहा

अंतरिम पोटगी अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देण्यात यावी.

RAJKIRAN UTTAMRAO INGLE

Digitally signed by RAJKIRAN UTTAMRAO INGLE
Date: 2025.05.05 17:32:07 +0530

(आर. यु. इंगळे)
दिनांकः ०५/०५/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
(न्यायालय क्र.२), अंबड

**आदेशाची प्रत विनामूल्य प्राप्त झाली.**

-------------------
अर्जदार

-------------------
गैरअर्जदार

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर निवेदन करते की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- के.एम.कुदर
न्यायालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
पी.डी.एफ.दिनांक :- ०५/०५/२०२५

स्वा/-
लघुलेखक